# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 28/10/2023 (शनिवार) सायंकाळ

---

## रेती चोरी करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. खापा :– अंतर्गत ०५ कि. मी. अंतरावरील मौजा गडेगाव शिवार येथे दिनांक २७/१०/२०२३ चे १०.३० वा. ते ११.१५ वा. दरम्यान खापा पोलीस पथक यांना गोपनीय माहीती मिळाली की, मौजा गडेगाव शिवार येथे अवैधरीत्या रेतीची चोरटी वाहतुक होत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरून खापा पोलीस पथकाने पेट्रोलिंग दरम्यान नमुद घटनास्थळी जावुन तिन्ही **आरोपी नामे–१) शिवाजी परसराम धुर्वे वय २१ वर्ष, दुधबर्डी ता.** सावनेर **२) अशोक बाळाराम बम्होरे वय ४० वर्ष रा. दुधबर्डी ता. सावनेर ३) आदित्य ओमप्रकाश टेकाम वय २२ वर्ष रा. दुधबर्डी ता. सावनेर** हे मौजा गडेगाव शिवारातील कन्हान नदीचे पात्रातील नाल्यातुन रेती भरुन घेवुन जात असताना पकडले असता सदर रेती ही टॅक्टर मालक नामे – अशोक बाळाराम बम्होरे याचे सांगीतले वरुन चोरून नेत असल्याचे सांगीतले आहे. सदर रेती बाबत रॉयल्टी किंवा परवाना विचारले असता रॉयल्टी नसल्याचे सांगीतले सदर ट्रॅक्टर मध्ये एक ब्रास रेती किंमती ५०००/–रु व लाल रंगाचे महीन्द्रा कंपनीचे ट्रॅक्टर क्र. एम. एच.–४०/बी.जे.– ८१०५ व त्याला लागुन असलेली विना नंबरची ट्रॉली अंदाजे किंमती ६,००,०००/– लाख रुपये असा एकुण ६,०५,०००/– रुपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे– पोशि पन्नालाल बटाउवाले यांच्या रिपोर्टवरून पोस्टे. खापा येथे आरोपीतांविरुध्द कलम ३७९, १०९, ३४ भादंवी सहकलम ४८(८) महाराष्ट्र जमीन महसुल संहीता १९६६ सहकलम ३/१८१ मोवाका. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार प्रकाश नांदुरकर पोस्टे खापा हे करीत आहे.

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. जलालखेडा :– दिनांक २६/१०/२०२३ चे ०९.०० वा. दरम्यान फिर्यादीचा मुलगा वय १७ वर्ष ६ महीने हा काटोल येथे कॉलेजला जातो म्हणुन घरून निघुन गेला परंतु रात्र होवुन घरी परत आला नाही त्याचे मोबाईल क्रमांकावर फोन लावला असता फोन बंद दाखवत असल्याने त्याचे मित्रांना फोन व्दारे विचारणा केली असता त्याच्या मित्राने सागितले की पेपर असुन सुदधा कॉलेजला आला नाही कोणीतरी अज्ञात इसमाने फिर्यादीचे मुलाला कशाचे तरी आमिश दाखवुन फुस लावुन फिर्यादीचे कायदेशीर रखवालीतुन फुस लावुन पळवुन नेले

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. जलालखेडा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक फिरोज शेख मो. नं. ७७२२०३६४५६ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर